लोकमत २० जानेवारी २०१५

# 'सकारात्मक दृष्टीकोन ठेवून वाटचाल करा'

रत्नागिरी : कोणतेही काम प्रामाणिकपणे करा. जिद्द व कष्ट करताना सकारात्मक दृष्टीकोन ठेवा. श्रमाला प्रतिष्ठा असणे आवश्यक आहे. निरपेक्ष वृत्तीने कार्यरत असताना आत्मविश्वासही तितकाच महत्त्वाचा आहे, असा सल्ला देशात व परदेशात आपले कर्तृत्व गाजविणाऱ्या 'रत्नागिरीकरांनी' दिला.

'शोध मराठी मनाचा' संमेलनात 'मुक्काम पोस्ट रत्नागिरी' कार्यक्रमात भारतीय क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष रवी सावंत, उद्योजक उदय लाड, बुक गंगाचे मंदार जोगळेकर, दूरदर्शनचे जयू भाटकर सहभागी झाले होते. चांगले साहित्य जतन व संवर्धन होणे गरजेचे आहे, याचे परदेशात असताना आकलन झाले. त्याचवेळी बुकगंगा स्थापन करण्याचा निर्णय घेतला. पुणे व साखरपा येथे 'ई' बुकचे काम सुरु असून, जगभर पुस्तके पोहोचविण्याचे काम सुरु केल्याचे मंदार जोगळेकर यांनी सांगितले. बदलत्या तंत्राच्या माध्यमातून पुस्तक, साहित्य युवकांपर्यंत पोहोचविण्यासाठी साखरपासारख्या गावात १५ युवक, युवती काम करीत आहेत. त्या सर्वांना एकत्रित रंगमंचावर आणले.

भारतीय क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष रवींद्र सावंत यांनी 'मी रत्नागिरीकर' असल्याचा अभिमान असल्याचे सांगितले. वडिलांमुळे शिस्त व क्रिकेटचे वेड लागल्याचे ते म्हणाले. दगड मारताना आपला नेम सुधारु शकतो, हे बालपणी आंबे पाडताना उमजले. सचिन तेंडुलकर व विनोद कांबळी ही क्रिकेट विश्वातील प्रसिद्ध जोडी. मात्र, कांबळी काही कारणास्तव लवकर बाहेर पडला तर राहुल द्रविडने मुक्तविद्यापीठाद्वारे देण्यात येणारी पी.एचडी. नम्रपणे नाकारल्याचे किस्से त्यांनी यावेळी सांगितले. (प्रतिनिधी)

# सर्वसमावेशक संमेलन : कर्णिक

रत्नागिरी : जागतिक मराठी अकादमीतर्फे आयोजित केलेले संमेलन आगळेवेगळे होते. साहित्य, कला, संगीत, चित्रपट, अनुभवी, तज्ज्ञ, परदेशी, विद्यार्थ्यांचा समावेश संमेलनात होता. त्यामुळे या संमेलनाव्दारे उद्‌बोधक अनुभव उपस्थितांना मिळाल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी केले.

जागतिक मराठी अकादमीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'शोध मराठी मनाचा' कार्यक्रमाच्या समारोपात कर्णिक बोलत होते. यावेळी ग्रमदास फुटाणे, नगराध्यक्ष अशोक मयेकर, उदय लाड, राजीव मंत्री उपस्थित होते. संमेलनास जाणकार व दर्दी लोकांची उपस्थिती होती. संमेलनातून मिळालेल्या आंनदाचे मूल्य येथील काही विद्यार्थ्यांना गवसेल, असे पाहावे, यातच संमेलनाचे फलित असल्याचे उद्योजक उदय लाड यांनी सांगितले. (प्रतिनिधी)